Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

सत्यासाठी लढणारा आवाज : पत्रकार ते ॲडव्होकेट जामखेडकर

(पान २ वर)




। शनिवार, दि. २४ एप्रिल २०२६ । वर्ष १ । अंक २० । पाने २।

DIGITAL EDITION

» Selected

### एसटीच्या डिझेल बचत योजनेला अर्थ खात्याचा अडथळा

**मुंबई** : एसटी महामंडळात मोठ्या प्रमाणात इंधनावर होणारा खर्च टाळण्यासाठी गुजरात मधून डिझेल खरेदी करण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे.पण राज्य सरकारच्या अर्थ खात्याने गुजरातमधून डिझेल खरेदी करण्यास अद्याप परवानगी दिल नाही. डिझेल अभावी राज्यातील ५५ आगारातील वाहतूक विस्कळीत झाली आहे. परिणामी प्रवासी आणि चालक या दोघांनाही नाहक त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचा आरोप महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी केला आहे. पुणेकरांची 'गॅस'कोंडी! बुकिंग करूनही सिलिंडरचा पत्ता नाही; वितरण व्यवस्था कोलमडलीएसटीला दररोज सरासरी १० लाख ८७ हजार लिटर इतके डिझेल लागत असून इंधनावर वर्षाला सरासरी ३ हजार ४०० कोटी रुपये इतका खर्च होत आहे.

## सामाजिक संस्थेकडून देणगी स्वरुपात मिळाली मुदतबाह्य औषधे


# प्रशासनाच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला

### भाईंदर येथील शासकीय रुग्णालयात आढळला १ कोटी ६५ लाख रुपयांच्या मुदतबाह्य औषधांचा साठा

जन सम्राट टाईम्स

**भाईंदर:** पश्चिम येथील पंडित भीमसेन जोशी शासकीय रुग्णालयात तब्बल १ कोटी ६५ लाख रुपयांच्या मुदतबाह्य (एक्सपायर) औषधांचा साठा आढळून आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे ही औषधे एका सामाजिक संस्थेकडून देणगी स्वरूपात देण्यात आली होती. मात्र रुग्णालय प्रशासनाच्या वेळेवरच्या सतर्कतेमुळे ही औषधे रुग्णांना देण्यात आली नाहीत आणि संभाव्य मोठा अनर्थ टळला.

देणगीतून आलेला साठा, पण मुदत संपलेली औषधे मिळालेल्या माहितीनुसार, २७ मार्च रोजी 'सक्षम फाउंडेशन' या सामाजिक संस्थेमार्फत रुग्णालयाला मोठ्या प्रमाणात औषधांचा साठा देण्यात आला. या कार्यक्रमावेळी आमदार नरेंद्र मेहता, महापौर डिंपल मेहता आणि उपमहापौर ध्रुव किशोर पाटील उपस्थित असल्याचा दावा केला जात आहे. मात्र, रुग्णालय प्रशासनाने औषधांची तपासणी केली असता धक्कादायक बाब समोर आली. या औषधांपैकी अनेक औषधांची मुदत ३० मार्चलाच संपत असल्याचे निदर्शनास आले. काही औषधे



आधीच मुदतबाह्य झालेली होती. रुग्णालयाचे व्यवस्थापक जाफर तडवी यांनी तातडीने या प्रकरणाची दखल घेत संबंधित संस्थेला लेखी तक्रार दिली. तसेच या घटनेची माहिती राज्य शासनालाही कळवण्यात आली. महत्वाचे म्हणजे, ही औषधे रुग्णांना वितरित न करता ताब्यात ठेवण्यात आली, त्यामुळे कोणतीही जीवितहानी टळली.या गंभीर प्रकाराची माहिती मिळताच महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शुक्रवारी रुग्णालयाला भेट देत संपूर्ण परिस्थितीची पाहणी केली. सतर्कतेचे कौतुक करत, संबंधित सामाजिक संस्थेविरुद्ध रुग्णांच्या जीवाशी खेळ केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले.तसेच रुग्णालयात असलेल्या विविध गैरसोयी आणि सुविधांतील त्रुटी दूर करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीच्या सूचना देण्यात आल्या.भाईंदरमधील २०० खाटांचे पंडित भीमसेन जोशी शासकीय रुग्णालय हे परिसरातील एकमेव मोठे शासकीय आरोग्य केंद्र आहे. संख्येने रुग्ण उपचारासाठी येतात. मात्र, अपुऱ्या सुविधा, मनुष्यबळाची कमतरता आणि व्यवस्थापनातील त्रुटी यामुळे रुग्णांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत

#### नागरिकांमध्ये या घटनेबाबत संताप


दरम्यान, नागरिकांमध्ये या घटनेबाबत संताप व्यक्त होत असून, रुग्णांच्या सुरक्षेबाबत अधिक कडक नियमांची मागणी होत आहे. या कार्यक्रमावेळी आमदार नरेंद्र मेहता, महापौर डिंपल मेहता आणि उपमहापौर ध्रुव किशोर पाटील उपस्थित असल्याचा दावा केला जात आहे. मात्र, रुग्णालय प्रशासनाने औषधांची तपासणी केली असता धक्कादायक बाब समोर आली. या औषधांपैकी अनेक औषधांची मुदत ३० मार्चलाच संपत असल्याचे निदर्शनास आले. काही औषधे आधीच मुदतबाह्य झालेली होती.रुग्णालयाचे व्यवस्थापक जाफर तडवी यांनी तातडीने या प्रकरणाची दखल घेत संबंधित संस्थेला लेखी तक्रार दिली. तसेच या घटनेची माहिती राज्य शासनालाही कळवण्यात आली.

असल्याच्या तक्रारी वारंवार समोर येत आहेत.आता पोलीस तपास आणि प्रशासकीय चौकशी सुरू होण्याची शक्यता असून, दोषींवर कारवाई होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

## पाळधी येथील केळी इराक/ गल्फ बाजारपेठेकडे रवाना

### NGX व्यवस्थापनामुळे निर्यातीला नवे बळ



जन सम्राट टाईम्स

**धरणगाव :** जळगाव जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक आणि आशादायक घडामोड समोर आली आहे. धरणगाव तालुक्यातील पाळधी बु येथील प्रगतिशील शेतकरी तथा लोकनियुक्त सरपंच विजय रुपसिंग पाटील यांच्या शेतात उत्पादित करण्यात आलेली जी-९ वाणाची केळी आता गल्फ देशांसह आंतरराष्ट्रीय बाजारपेठेकडे रवाना होत आहे. २७ जून रोजी लागवड करण्यात आलेल्या या केळी पिकावर NGX व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून, त्यामुळे केळीला उच्च दर्जाची गुणवत्ता आणि अधिक टिकवण क्षमता प्राप्त झाली आहे. कटिंगनंतर दीर्घकाळ ताजेपणा टिकून राहतो, हे या केळीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले आहे. सदर केळीची लागवड साडेपाच एकरमध्ये करण्यात आली आहे या केळीचे सिलेंडर आकाराचे बंच, सुमारे एक फूट लांबी, आकर्षक चमक (शायनिंग) आणि सरासरी 29.5 रास ही वैशिष्टे बाजारात विशेष ठरली असून, यामुळे शेतकऱ्यांना अधिक दर मिळत आहे. तसेच प्रति एकर सुमारे ४२ टन उत्पादन क्षमता असल्याने ही पद्धत आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरत आहे. या प्रगत प्लॉटला जिल्हाभरातून हजारो शेतकरी भेट देत असून, त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून या पद्धतीचा अभ्यास सुरू केला आहे. तज्ज्ञांच्या मते, या गुणवत्तापूर्ण उत्पादनामुळे भविष्यात युरोप, रशिया तसेच गल्फ देशांमध्ये निर्यातीच्या मोठ्या संधी उपलब्ध होऊ शकतात. दरम्यान, राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी या केळी प्लॉटला भेट देऊन शेतकऱ्यांचे कौतुक केले. NGX व्यवस्थापनामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन आर्थिक प्रगतीला चालना मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

#### "केळी हब" बनण्याचे स्वप्न

तसेच अशा उपक्रमांमुळे जळगाव जिल्ह्याचे "केळी हब" बनण्याचे स्वप्न साकार होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. याच पार्श्वभूमीवर, पाळधी येथून केळीची निर्यात प्रक्रिया सुरू झाली असून, आर.सी. राजमाता एक्सपोर्ट (अंतुली) मार्फत माल सोलापूर येथील के.डी. एक्सपोर्टकडे पाठविण्यात आला आहे. पुढे हा माल जवाहरलाल नेहरू बंदर, मुंबई येथून सौदी अरेबियातील जेद्दा बंदराकडे रवाना करण्यात येत आहे.

## शालेय शिक्षण विभागाच्या पोषण आहारांतर्गत परसबाग उपक्रम!

जन सम्राट टाईम्स

**मुंबई:** बुलढाणा तालुक्यातील सव येथील विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाने शालेय शिक्षण विभागाच्या पोषण आहारांतर्गत राबविण्यात आलेल्या परसबाग स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांना सकस आणि ताज्या भाजीपाल्याचा आहार मिळावा या उद्देशाने सुरू करण्यात आलेल्या या उपक्रमात शाळेने सेंद्रिय पद्धतीने भाजीपाला पिकवून आदर्श निर्माण केला आहे. या यशामुळे शाळेचे तसेच गावाचे नाव तालुकास्तरावर उजळले आहे.महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागामार्फत पोषण आहार योजनेअंतर्गत परसबाग स्पर्धा अभियान राबविण्यात येत आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना रासायनिक घटकांपासून मुक्त, ताज्या आणि पोषक भाजीपाल्याचा पुरवठा करणे हा आहे. शाळांमध्येच परसबाग तयार करून त्यामध्ये विविध प्रकारच्या भाज्यांची लागवड करण्यास प्रोत्साहन दिले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना पोषणमूल्यांनी समृद्ध अन्न मिळण्यास मदत होते, तसेच शेतीविषयक प्राथमिक ज्ञानही मिळते.विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाने या स्पर्धेसाठी विशेष तयारी करत परसबागेत तब्बल १५ प्रकारच्या भाजीपाल्याची लागवड



केली. यात पालक, मेथी, टोमॅटो, वांगी, मिरची अशा विविध भाज्यांचा समावेश आहे. या भाज्यांमधून तयार होणारा ताजा आहार विद्यार्थ्यांच्या दैनंदिन पोषण आहारात समाविष्ट केला जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यात सकारात्मक बदल दिसून येत असून त्यांना आवश्यक जीवनसत्त्वे नैसर्गिक पद्धतीने मिळत आहेत. या यशामागे शाळेचे प्राचार्य पुरुषोत्तम पडोळ, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच गावकऱ्यांचा मोठा सहभाग राहिला आहे. सर्वांनी मिळून परसबागेची देखभाल, पाणीपुरवठा, खत व्यवस्थापन यासाठी सातत्याने मेहनत घेतली. संस्थाध्यक्ष योगेंद्र गोडे यांचे मार्गदर्शन आणि केंद्रप्रमुख वाघ यांच्या वेळोवेळी भेटीमुळे शाळेला योग्य दिशा मिळाली, असे शिक्षकांनी सांगितले.परसबाग स्पर्धेमुळे शाळांमध्ये आरोग्यदायी स्पर्धा निर्माण झाली आहे. प्रत्येक शाळा अधिक सुंदर आणि समृद्ध बाग तयार करण्यासाठी प्रयत्न करत असल्याने या उपक्रमाचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकांपुरते शिक्षण न राहता प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळत आहे. एकूणच, परसबाग उपक्रमामुळे पोषण आहार अधिक गुणवत्तापूर्ण होत असून विद्यार्थ्यांच्या आरोग्यवृद्धीसाठी हा उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरत आहे. विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाने मिळवलेले हे यश इतर शाळांसाठी प्रेरणादायी ठरत असून, अशा उपक्रमांमुळे शिक्षणासोबतच आरोग्याचा पाया अधिक मजबूत होत आहे. बुलढाणा तालुक्यातील सव येथील विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाने शालेय शिक्षण विभागाच्या पोषण आहारांतर्गत राबविण्यात आलेल्या परसबाग स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळांमध्येच परसबाग तयार करून त्यामध्ये विविध प्रकारच्या भाज्यांची लागवड करण्यास प्रोत्साहन दिले जाते.

## मुंबई बंदच्या धमक्यांना मनसे भीक घालणार नाही

जन सम्राट टाईम्स

**मुंबई:** "रिक्षा चालवणार नाही म्हणून मुंबई बंद होईल" अशा धमक्या देणाऱ्यांना आता धडा शिकवण्याची वेळ आली आहे. मुंबई म्हणजे काही बाहेरून आलेले लोक नाहीत, तर येथे राहणारा मराठी माणूसच मुंबई आणि महाराष्ट्राची ओळख आहे. कोणत्याही बाहेरच्या घटकांना महाराष्ट्राला वेढा घालता येणार नाही," अशा शब्दांत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते संदीप देशपांडे यांनी पत्रकार परिषदेत मुंबई आणि महाराष्ट्राला धमक्या देणाऱ्यांना इशारा दिला आहे. मराठी भाषा सक्तीचा कायदा २०१२ पासून अस्तित्वात असूनही अंमलबजावणी का झाली नाही, असा सवाल देशपांडे यांनी उपस्थित केला. मराठी येत नसतानाही परवाने देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी. तसेच प्रताप सरनाईक यांनीही अमराठी रिक्षाचालकांना परवाने देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.रिक्षा-टॅक्सी चालकांना केवळ काही शब्द नव्हे तर संपूर्ण मराठी भाषा येणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रात राहून उपजीविका करणाऱ्यांनी मराठी शिकलीच पाहिजे, असे ते म्हणाले. तसेच दक्षिणेकडील राज्यांमध्ये केंद्र सरकार भांडण लावते, असा आरोप करत या राज्यांनी एकत्र येण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. संजय निरुपम यांच्यावर टीका करत देशपांडे यांनी त्यांना "टुकार माणूस" अशा . त्यांच्या वक्तव्यांकडे गांभीर्याने घेण्याची गरज नसल्याचे सांगत, संप करून दाखवावा आणि महाराष्ट्राला वेढा घालता येतो का ते स्पष्ट करावे, असे त्यांनी आव्हान दिले.

## डिजिटल गेम डेव्हलपर स्पर्धा युवकांसाठी नवी संधी निर्माण करणारी

### मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी व्यक्त विश्वास

जन सम्राट टाईम्स

**मुंबई:** महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागांतर्गत राज्य नाविन्यता सोसायटीच्या वतीने भारतात प्रथमच आयोजित करण्यात आलेली डिजिटल गेम डेव्हलपर स्पर्धा युवकांसाठी नवी संधी निर्माण करणारी ठरेल, असा विश्वास कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी व्यक्त केला. या अभिनव उपक्रमातून महाराष्ट्र जागतिक दर्जाच्या गेमिंग क्षेत्रात मोठी भरारी घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.चर्चगेट येथील इंडियन मर्चंट्स चेंबर (IMC) सभागृहात राज्य नाविन्यता सोसायटी, युनिटी आणि गुगल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गेम डेव्हलपर प्रशिक्षण कार्यक्रमाच्या समारोप व पारितोषिक वितरण समारंभात ते बोलत होते. या कार्यक्रमाला कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाच्या अपर मुख्य सचिव सौ. मनीषा वर्मा, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रीकांत पाटील; तमिळनाडू कौशल्य विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. व्ही. विष्णू, गुगल प्लेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. आदित्य स्वामी तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.यावेळी बोलताना मंत्री लोढा म्हणाले की, देशाचे माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेनुसार सर्जनशीलता आणि नावीन्यतेच्या बळावर भारत जागतिक स्तरावर अग्रस्थानी पोहोचू शकतो. कौशल्य विकासाच्या माध्यमातून जागतिक दर्जाचे तंत्रज्ञान युवकांपर्यंत पोहोचविण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. त्याच धर्तीवर आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य गेमिंग आणि डिजिटल क्षेत्रात आघाडीचे केंद्र बनविण्यासाठी प्रयत्नशील आहे.मनीषा वर्मा, यांनी आपल्या मनोगतात राज्य शासनाच्या कौशल्य विकास उपक्रमांवर प्रकाश टाकताना सांगितले की, उद्योगस्नेही आणि मानकीकृत प्रशिक्षण कार्यक्रमांमुळे युवकांना जागतिक दर्जाच्या कौशल्यांची जोड मिळत आहे. अशा उपक्रमांमुळे रोजगारक्षमता वाढण्यासोबतच अर्थव्यवस्थेलाही चालना मिळत आहे. डॉ. श्रीकांत पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटी यांनी सांगितले .

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज | ज

## पोलिसांची कारवाई : 100 कर्कश सायलेन्सर आणि 250 फॅन्सी नंबर प्लेट्स नष्ट

### रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत कडक पावले; वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर विशेष

जन सम्राट टाईम्स

**जळगाव** : जळगाव शहरात रस्ता सुरक्षा अभियानाला गती देत वाहतूक शाखेकडून मोठी आणि कठोर कारवाई करण्यात आली. कर्णकर्कश आवाज करणाऱ्या दुचाकींचे सायलेन्सर आणि अवैधरीत्या वापरल्या जाणाऱ्या फॅन्सी नंबर प्लेट्सवर पोलिसांनी विशेष मोहीम राबवून तब्बल १०० सायलेन्सर आणि २५० नंबर प्लेट्स जप्त केल्या. जप्त करण्यात आलेल्या या साहित्याचा आज रोड रोलरच्या सहाय्याने नाश करण्यात आला. शहरात वाढत्या ध्वनीप्रदूषणाबाबत नागरिकांकडून वारंवार तक्रारी येत होत्या. विशेषतः दुचाकींना बसवण्यात येणारे




बदललेले (मॉडिफाइड) सायलेन्सर मोठ्या आवाजामुळे परिसरातील रहिवासी, ज्येष्ठ नागरिक तसेच शाळकरी विद्यार्थ्यांसाठी त्रासदायक ठरत होते. या पार्श्वभूमीवर वाहतूक शाखेने शहरातील विविध भागांत तपासणी मोहीम हाती घेतली. या कारवाईदरम्यान तपासण्यात आलेल्या दुचाकींवर बसवलेले सायलेन्सर हे मूळ कंपनीकडून दिलेले नसून, वाहन खरेदी केल्यानंतर बाहेरून बसवण्यात आले असल्याचे उघड झाले. अशा सायलेन्सरमुळे निर्माण होणारा कर्णकर्कश आवाज केवळ ध्वनीप्रदूषण वाढवत नाही, तर वाहनचालकांचे लक्ष विचलित होऊन अपघाताचा धोका देखील वाढवतो, असे पोलिसांनी स्पष्ट केले. याशिवाय, नियमबाह्य पद्धतीने डिझाइन केलेल्या आणि वाहन क्रमांक स्पष्ट न दिसणाऱ्या २५० फॅन्सी नंबर प्लेट्सही जप्त करण्यात आल्या. या प्लेट्समुळे वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांची ओळख पटवणे कठीण होते, त्यामुळे कायद्याची अंमलबजावणी करण्यात अडथळे येत होते. जप्त करण्यात आलेले सायलेन्सर आणि नंबर प्लेट्स पोलिस अधीक्षक Shrikant Dhivare यांच्या आदेशानुसार रोड रोलरखाली चिरडून पूर्णपणे निकामी करण्यात आले. या कारवाईचा उद्देश नियमभंग करणाऱ्यांना कडक संदेश देणे हा असल्याचे पोलिसांनी सांगितले.

#### नागरिकांना आवाहन

वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. त्यामुळे नागरिकांनी नियमांचे पालन करून स्वतःचा आणि इतरांचा जीव सुरक्षित ठेवावा, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे.ही मोहीम पुढेही सातत्याने आणि अधिक तीव्रतेने राबवली जाणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. जळगाव जिल्हा "शून्य प्राणहानी"च्या दिशेने नेण्यासाठी रस्ता सुरक्षा समितीमार्फत जनजागृतीबरोबरच कठोर कारवाई सुरू ठेवली जाणार आहे.

## आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी एस. एन. नांदेडकर सरांची निवड!

जन सम्राट टाईम्स

**पुणे :** पैलवान सुभाषदादा पाटील युथ फाऊंडेशन, महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने आयोजित राष्ट्रीय पुरस्कार सोहळा २०२५-२६ अंतर्गत संघशिल भद्रे उर्फ एस. एन. नांदेडकर सर (स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक व पत्रकार) यांची राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. सामाजिक कार्य, नवउद्योजकता, कृषीक्षेत्र, कला-रंजन आणि पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यासाठी या पुरस्काराचे आयोजन करण्यात येते. राज्यभरातून प्राप्त झालेल्या अर्जांमधून नांदेडकर सरांच्या कार्याची दखल घेत त्यांची निवड करण्यात आल्याची माहिती फाउंडेशनकडून देण्यात आली. पुणे, मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रात स्पर्धा



परीक्षा क्षेत्रात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नांदेडकर सरांनी मोलाचे योगदान दिले आहे.समाजप्रबोधनाचे कार्य करत त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेक विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळाली असून, समाजात सकारात्मक बदल घडवण्यास मदत झाली आहे. लवकरच हा पुरस्कार सोहळा भव्यदिव्य स्वरूपात आयोजित करण्यात येणार असून, त्यामध्ये नांदेडकर सरांचा सन्मान केला जाणार आहे.

# जळगावचे माजी महापौर कोल्हेंना सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन

## जिल्हा व उच्च न्यायालयाकडून नकारानंतर दिलासा

जन सम्राट टाईम्स

जळगाव : बनावट कॉल सेंटर प्रकरणात अटक झालेल्या जळगावचे माजी महापौर ललित विजयराव कोल्हे यांना आज Supreme Court of India कडून जामीन मंजूर करण्यात आला आहे. जिल्हा व सत्र न्यायालय तसेच उच्च न्यायालयाकडून जामीन अर्ज फेटाळल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या या निर्णयामुळे कोल्हे यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयामुळे संपूर्ण प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. ममुराबाद रोडवरील एल.के. फार्म येथे काही महिन्यांपूर्वी पोलिसांनी छापा टाकला होता. या कारवाईदरम्यान तेथे बनावट कॉल सेंटर सुरू असल्याचे उघड झाले होते. तपासात या कॉल सेंटरच्या माध्यमातून परदेशी नागरिकांची ऑनलाईन फसवणूक केली जात असल्याचा आरोप समोर आला. या ठिकाणी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून फसवणुकीचे जाळे उभारण्यात आले असल्याचे पोलिसांनी सांगितले होते. या प्रकरणात जागेचे मालक म्हणून ललित कोल्हे यांच्यासह इतर काही आरोपींना अटक करण्यात आली होती. पोलिसांनी या कारवाईनंतर मोठ्या प्रमाणात संगणक, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि महत्त्वाची कागदपत्रे जप्त केली होती. प्राथमिक तपासात हे एक संघटित रॅकेट असल्याचा संशय



व्यक्त करण्यात आला होता. दरम्यान, अटकेनंतर कोल्हे यांनी जामिनासाठी जळगाव जिल्हा व सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता. मात्र, न्यायालयाने गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेत जामीन नाकारला. त्यानंतर त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली; परंतु तेथूनही त्यांना दिलासा मिळाला नाही. अखेर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाने प्रकरणातील कागदपत्रे, पुरावे आणि दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकून कोल्हे यांना जामीन मंजूर केला. जामीन देताना न्यायालयाने काही अटी घातल्याची माहिती मिळत आहे. तपासात सहकार्य करणे, पुराव्यांमध्ये हस्तक्षेप न करणे आणि संबंधित यंत्रणांसमोर हजर राहणे या अटींचा त्यात समावेश असल्याचे सांगितले जात आहे. या प्रकरणामुळे जळगाव जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली होती. विशेषतः माजी महापौरांचा यात समावेश असल्याने राजकीय आणि सामाजिक वर्तुळात चर्चा रंगली होती.


### नेमक्या किती लोकांची फसवणूक?

या कॉल सेंटरच्या माध्यमातून नेमक्या किती लोकांची फसवणूक झाली, याचा तपास अद्याप सुरू असून, तपास यंत्रणा या प्रकरणाचा सखोल छडा लावत आहेत. दरम्यान, कोल्हे यांना मिळालेल्या जामिनानंतर पुढील न्यायालयीन प्रक्रिया आणि तपासाच्या दिशेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या प्रकरणातील इतर आरोपींविषयी काय निर्णय होतो, तसेच तपासातून आणखी कोणती माहिती समोर येते, याबाबत उत्सुकता वाढली आहे.

---

## वंद्य वंदे मातरम्'च्या सहाव्या आवृत्तीचे उत्साहपूर्ण अनावरण

कल्याण : जागतिक पुस्तक दिनाच्या निमित्ताने अक्षरमंच प्रकाशन तर्फे डॉ. योगेश जोशी लिखित 'वंद्य वंदे मातरम्' या पुस्तकाच्या सहाव्या आवृत्तीचे अनावरण उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. प्रा. गजेंद्र दीक्षित, प्रा. शैलेश रेगे आणि लेखक हेमंत नेहते यांच्या हस्ते पुस्तकाचे अनावरण करण्यात आले. वंदे मातरम् या गीताला ७ नोव्हेंबर २०२५ रोजी १५० वर्षे पूर्ण



झाल्याच्या पार्श्वभूमीवर, त्याचा इतिहास युवा पिढीपर्यंत पोहोचावा या उद्देशाने या पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रकाशित करण्यात आली होती. आतापर्यंत सुमारे ९ हजारांहून अधिक प्रती कल्याण-डोंबिवलीसह पुणे, नाशिक, रत्नागिरी आणि गोवा येथील शाळांमध्ये विनामूल्य वितरित करण्यात आल्या आहेत. या उपक्रमाचे संकल्पनाकार डॉ. योगेश जोशी यांनी ७ नोव्हेंबर २०२६ पर्यंत २५ हजार प्रती विनामूल्य वितरित करण्याचा संकल्प यावेळी जाहीर केला.

### देशभक्तीची भावना अधिक दृढ

पुस्तकात बंकिमचंद्र चॅटर्जी यांचे चरित्र, आनंदमठ कादंबरीचे कथासूत्र, 'वंदे मातरम्'ची निर्मिती आणि या गीतामुळे घडलेली क्रांती यांचा समावेश आहे. या उपक्रमामुळे 'वंदे मातरम्'चा इतिहास नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचत असून, विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना अधिक दृढ होत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

---

Selected

### शिवसेना नगरसेवकांची संयुक्त शिबिरांची मागणी

**मुंबई:** : शिवसेना नगरसेवक भास्कर शेट्टी यांनी गुरुवारी (23 एप्रिल 2026) एनएमडीपीएल अधिकाऱ्यांची भेट घेऊन धारावी येथे डीआरपी, मुंबई महापालिका आणि बेस्ट अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कागदपत्र पडताळणी शिबिर आयोजित करण्याबाबत चर्चा केली. या शिबिराच्या माध्यमातून सर्वेक्षणाच्या निकालांबाबत नागरिकांच्या शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न होणार आहे. शेट्टी यांनी सांगितले की, पात्रता प्रक्रियेत अनेक नागरिकांना "अनिर्णीत" (Undecided) असा दर्जा देण्यात आल्याने ते असमाधानी असून त्यांना तात्काळ स्पष्टता आवश्यक आहे. त्यामुळे सर्व संबंधित विभागांचे अधिकारी एकाच ठिकाणी उपस्थित राहून 'एक खिडकी – सिंगल-विंडो' पद्धतीने कागदपत्रांची पडताळणी व निर्णय प्रक्रिया जलद करण्यात यावी, असा प्रस्ताव त्यांनी मांडला. याशिवाय, अद्याप सर्वेक्षणात सहभागी न झालेल्या नागरिकांसाठी स्वतंत्र जनजागृती मोहीम राबवून त्यांच्यासाठीही अशाच प्रकारचे शिबिर आयोजित करावे, जेणेकरून त्यांना कागदपत्रे सादर करून प्रक्रिया पूर्ण करण्याची संधी मिळेल, एनएमडीपीएल अधिकाऱ्यांनी समन्वयित प्रयत्नांमुळे कागदपत्र पडताळणी प्रक्रिया सुलभ होऊन नागरिकांमधील संभ्रम कमी होण्यास मदत होईल, असे नमूद केले. या बैठकीत नगरसेवकांना प्रकल्पाचे फायदे आणि पात्रतेचे निकष याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

---

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

## उन्हाचा कहर; रावेरमध्ये उष्मघाताने कामगाराचा मृत्यू

### ४२° तापमानाचा तडाखा; राज्यात उष्णतेची तीव्र लाट

। जन सम्राट टाईम्स ।

**जळगाव :** जळगाव जिल्ह्यात उन्हाची तीव्रता आता जीवघेणी ठरत असून, रावेर येथे उष्मघातामुळे एका कष्टकरी कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली आहे. योगेश सुधाकर महाजन असे मृत व्यक्तीचे नाव असून, त्यांच्या अकाली निधनामुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

योगेश महाजन हे कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी दिवसभर बांधकाम क्षेत्रात मजुरी करत होते. वाढत्या महागाईत घर चालवण्यासाठी ते फावल्या वेळेत दुधाच्या डेअरीमध्येही काम करीत. मात्र, कडाक्याच्या उन्हात सातत्याने काम केल्याने त्यांच्या प्रकृतीवर गंभीर परिणाम झाला.

**रात्री अचानक प्रकृती खालावली**

उष्णतेच्या झळांमुळे त्रस्त असलेल्या योगेश यांची प्रकृती रात्री अचानक बिघडली. उपचारापूर्वीच सुमारे रात्री एक वाजेच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी आणि दोन लहान मुले असा परिवार असून, कुटुंबाचा एकमेव आधार हरपल्याने भविष्यासंदर्भात मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

**जिल्ह्यात ४२° पार; 'लू'मुळे जनजीवन विस्कळीत**

सध्या जळगाव जिल्ह्यात तापमान ४२ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले आहे. दुपारच्या वेळी वाहणाऱ्या उष्ण वाऱ्यांमुळे (लू) नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले आहे. या



पार्श्वभूमीवर नागरिकांनी दुपारी बाहेर पडणे टाळावे, पाणी आणि द्रवपदार्थांचे सेवन वाढवावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

**मुंबईत उकाडा, विदर्भात उच्चांक**

दरम्यान, मुंबईत हवेतील बाष्प वाढल्याने नागरिक घामाघूम झाले आहेत. शहरात कमाल तापमान ३४ अंश, तर किमान तापमान २६ अंश सेल्सिअस नोंदवले गेले आहे. दुसरीकडे विदर्भात उष्णतेचा प्रकोप कायम असून, अकोल्यात तापमान ४५ अंशांवर पोहोचले आहे.

**लवकरच दिलासा? अवकाळी पावसाची शक्यता**

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यानंतर काही भागांत तापमानात किंचित घट होण्याची शक्यता आहे. तसेच २६ एप्रिलपर्यंत कोकण आणि मध्य महाराष्ट्रात अवकाळी पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. मुंबईतही हलक्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे. वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचा धोका वाढला असून, विशेषतः मजूर, शेतकरी आणि बाहेर काम करणाऱ्या नागरिकांनी अधिक काळजी घेणे गरजेचे आहे.

---

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

## नशिराबादमध्ये जय मल्हार'चा जयघोष

### बारा गाड्या' सोहळा उत्साहात

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद** : नशिराबाद येथील पेठ परिसरात KHANDOBA महाराज यात्रोत्सवानिमित्त पारंपरिक 'बारा गाड्या' ओढण्याचा सोहळा बुधवारी (दि. २२ एप्रिल) मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावात पार पडला. काही वर्षांच्या खंडानंतर पुन्हा सुरू झालेल्या या परंपरेमुळे ग्रामस्थांमध्ये नवचैतन्याचे वातावरण निर्माण झाले होते. सोहळ्याची सुरुवात होताच संपूर्ण परिसर "येळकोट येळकोट जय मल्हार"च्या जयघोषाने दुमदुमून गेला. ढोल-ताशांचा कडकडाट, सनई-चौघड्यांचे मंगल स्वर आणि भगव्या झेंड्यांनी सजलेली मिरवणूक यामुळे वातावरण पूर्णतः भक्तिमय झाले होते. भाविकांनी मोठ्या प्रमाणावर भंडाऱ्याची उधळण करत या सोहळ्यात सहभागी होत आपली श्रद्धा व्यक्त केली. अंगावर उडणारा सोन्यासारखा भंडारा आणि जयघोषामुळे नशिराबाद नगरी 'मल्हारमय' झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. या ऐतिहासिक सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले ते भगत उमेश दिलीप धनगर. त्यांनी श्री खंडेराव महाराज मंदिरापासून ते गावसीमेपर्यंत अत्यंत श्रद्धा आणि ताकदीने 'बारा गाड्या' ओढल्या. ही परंपरा अत्यंत कठीण आणि



कौशल्यपूर्ण मानली जाते. त्यामुळे हा सोहळा पाहण्यासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली होती.

**बारा गाड्यांची परंपरा**

उत्सव समितीच्या वतीने सांगण्यात आले की, "आपली प्राचीन संस्कृती आणि परंपरा जपण्यासाठी ग्रामस्थांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. बारा गाड्यांची परंपरा ही आपल्या वारशाचा अविभाज्य भाग असून, ती पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हे आपले कर्तव्य आहे." पुन्हा सुरू झालेल्या या परंपरेमुळे नशिराबादच्या सांस्कृतिक वारशात नवसंजीवनी मिळाली असून, हा सोहळा भविष्यातही अधिक भव्य स्वरूपात साजरा केला जाईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे.

---

## शेतकऱ्यांसाठी 'शेतपानंद' रस्ते योजना ठरणार गेमचेंजर – मंत्री गुलाबराव पाटील

### जिल्हास्तरीय बैठकीत अंमलबजावणीला गती देण्याचे निर्देश; दर्जेदार कामावर भर

जन सम्राट टाईम्स

**कल्याण :** राज्य शासनाची मुख्यमंत्री बळीराजा शेतपानंद रस्ते योजना ही शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणारी ठरणार असून, संबंधित यंत्रणांनी तिची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश पालकमंत्री GULABRAO PATIL यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील समिती सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय बैठकीत ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी रोहन घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी करिष्मा नायर, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. "बैलांच्या पावलांचा



विचार करणारी योजना" पालकमंत्री पाटील म्हणाले की, ही योजना केवळ कागदावर मर्यादित नसून बळीराजाच्या दैनंदिन जीवनात प्रत्यक्ष बदल घडवणारी आहे. "चारचाकी वाहनांच्या सोयीपेक्षा शेतात जाणाऱ्या बैलांच्या पावलांचा विचार करणारी ही योजना आहे. त्यामुळे ती शेतकऱ्यांसाठी खऱ्या अर्थाने वरदान ठरणार आहे," असे त्यांनी स्पष्ट केले. स्थानिक आमदारांच्या समन्वयातून कामे पूर्ण करणे 9 ठेकेदार पात्र प्रारंभी निविदांना अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे काहीसा विलंब झाला होता. मात्र नव्या निविदांमध्ये 9 ठेकेदार पात्र ठरले असून, दर कमी करून प्रस्ताव समितीकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. जिल्हास्तरीय समितीने एल-1 दरास मान्यता दिली. कामाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचे सांगत त्यांनी सर्व कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांनी आठवड्यातून किमान एक बैठक घेऊन कामांचा आढावा घ्यावा, तसेच स्थानिक आमदारांच्या सूचनांनुसार कामांना गती द्यावी, असे निर्देश दिले. एकूण चित्र ही योजना केवळ रस्ते बांधकामापुरती मर्यादित नसून शेतकऱ्यांच्या दैनंदिन जीवनात सुलभता निर्माण करणारी ठरत आहे. योग्य नियोजन आणि काटेकोर अंमलबजावणीमुळे जळगाव जिल्ह्यात शेती विकासाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

### अंमलबजावणीसाठी सूचना

50% काम प्रधानमंत्री ग्रामसडक योजना आणि 50% जिल्हा परिषद मार्फत प्रत्येक विधानसभा मतदारसंघात 25 किमीचा क्लस्टर तयार करणे 14 डिसेंबर 2025 च्या शासन निर्णयानुसार कामांना सुरुवात स्थानिक आमदारांच्या समन्वयातून कामे पूर्ण करणे 9 ठेकेदार पात्र प्रारंभी निविदांना अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे काहीसा विलंब झाला होता. मात्र नव्या निविदांमध्ये 9 ठेकेदार पात्र ठरले असून, दर कमी करून प्रस्ताव समितीकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. जिल्हास्तरीय समितीने एल-1 दरास मान्यता दिली.

---

## मुंबईतील प्रदूषण मोजणी प्रकल्प ठप्प!

जन सम्राट टाईम्स

**कल्याण :** मुंबईतील हवेची गुणवत्ता दिवसेंदिवस खालावत असताना पालिकेची एक महत्त्वाची योजना प्रशासकीय पेचात अडकली आहे. शहरातील प्रदूषणाचे नेमके स्रोत शोधण्यासाठी आणि हॉटस्पॉटवर नजर ठेवण्यासाठी ४ मोबाईल एअर क्वालिटी मॉनिटरिंग व्हॅन खरेदी करण्याचे ५ कोटींचे टेंडर पालिकेने अखेर रद्द केले आहे. निविदा प्रक्रियेत सहभागी झालेल्या ठेकेदारांनी पालिकेच्या अंदाजित रकमेपेक्षा तब्बल ५८ टक्के जादा दराची मागणी केल्याने प्रशासनाने हा प्रकल्प सध्या गुंडाळला आहे. गेल्या दोन वर्षांत, विशेषतः २०२३ आणि २०२४ मध्ये मुंबईतील वायू प्रदूषणाने नीचांकी पातळी गाठली होती. तर हिवाळ्यात मुंबईची हवा दिल्लीपेक्षाही खराब झाल्याचे दिसून आले होते. या पार्श्वभूमीवर, मुंबई उच्च न्यायालयाने पालिकेच्या ढिसाळ नियोजनावर ताशेरे ओढले होते. त्यानंतर तातडीची उपाययोजना



म्हणून पालिकेने फिरत्या प्रयोगशाळा म्हणजेच एअर क्वालिटी व्हॅन घेण्याचे निश्चित केले होते. या व्हॅनच्या माध्यमातून भायखळा, अंधेरी यांसारख्या दाट वस्तीच्या आणि लघु उद्योग असलेल्या भागांतील हवेची गुणवत्ता मोजली जाणार होती. परंतु, आता व्हॅन खरेदीचे कंत्राट रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे नव्याने निविदा प्रक्रिय राबवून खरेदीच्या प्रक्रियेला वेळ लागणार असून, प्रदूषण नियंत्रण मोहिमेवर मर्यादा येणार आहेत. नवीन निविदा प्रक्रिया राबवेपर्यंत मुंबईकराना प्रदूषणाच्या अचूक आणि क्षेत्रीय माहितीसाठी प्रतीक्षा करावी लागणार असून, आगामी हिवाळ्यापूर्वी ही यंत्रणा सज्ज होणार का, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

---

## कल्याणमध्ये 4 मे रोजी तणाव वाढण्याची शक्यता

### मराठीच्या मुद्यावर मनसेचा आक्रमक



जन सम्राट टाईम्स

**कल्याण:** कल्याणमध्ये मराठी भाषेच्या सक्तीच्या मुद्द्यावरून राजकीय वातावरण तापले असून, 4 मे रोजी संभाव्य आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर तणाव वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. मराठी सक्तीच्या विरोधात काही संघटनांनी आंदोलनाची हाक दिल्यानंतर (मनसे) आक्रमक झाली आहे. मराठी भाषेच्या सन्मानाच्या मुद्द्यावर मनसेने ठाम भूमिका घेत, विरोधकांना "मनसे स्टाईल"ने उत्तर देण्याचा इशारा दिला आहे.

मराठी रिक्षा चालकांना त्रास दिला गेला किंवा मराठी भाषेचा अवमान झाल्यास कठोर प्रतिक्रिया दिली जाईल, असे मनसे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, मनसेच्या शिष्टमंडळाने आरटीओ कल्याण येथे भेट देत प्रशासनाला निवेदन सादर केले. माजी आमदार RAJU PATIL यांच्या नेतृत्वाखाली हे शिष्टमंडळ गेले होते. सार्वजनिक सेवा क्षेत्रात मराठीचा वापर अनिवार्य असतानाही अनेक चालक नियमांचे पालन करत नसल्याचा आरोप मनसेने केला आहे. रिक्षा-टॅक्सी चालकांची मराठी ज्ञान तपासणी नियम मोडणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई परवाना नूतनीकरणात मराठीची अट सक्तीने लागू करणे मीटरनुसार प्रवासासाठी स्वतंत्र व्यवस्था शेअरिंग रिक्षांसाठी अधिकृत थांबे प्रवास नाकारणाऱ्या चालकांचे परवाने रद्द करणे याशिवाय, मराठी रिक्षा चालकांना ओळख देण्यासाठी वाहनांवर विशेष स्टिकर्स लावण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे. प्रशासनाने तातडीने उपाययोजना न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा जिल्हाध्यक्ष उल्हास भोईर, योगेश पाटील आणि अरुण जांभळे यांनी दिला आहे. त्यामुळे 4 मे रोजी कल्याणमध्ये काय घडते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

## सत्यासाठी लढणारा आवाज : पत्रकार ते अ‍ॅडव्होकेट रणजित जामखेडकर

### निर्भीड पत्रकारिता, कायद्याची जाण आणि समाजासाठीची बांधिलकी; प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व

जन सम्राट टाईम्स

**नांदेड:** : समाजात अनेक व्यक्ती येतात आणि काळाच्या ओघात हरवून जातात; मात्र काही जण आपल्या कार्याने आणि विचारांनी समाजमनावर ठसा उमटवतात. पत्रकार तसेच अ‍ॅडव्होकेट रणजित विठ्ठलराव जामखेडकर हे अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक असून, त्यांनी आपल्या निर्भीड भूमिकेमुळे आणि समाजाभिमुख कार्यामुळे वेगळी ओळख निर्माण केली आहे. नांदेड जिल्ह्यातील मुखेड-जामखेड या भागात वाढलेले रणजित जामखेडकर यांचा जीवनप्रवास हा संघर्ष, जिद्द आणि ध्येयपूर्तीचा आदर्श नमुना आहे. सर्वसामान्य कुटुंबात जन्म असूनही त्यांनी मोठी स्वप्ने पाहिली आणि ती पूर्ण करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची पायाभरणी घरातील संस्कारांतून झाली. आई अंगणवाडी सेविका असल्यामुळे शिक्षणाची ओढ, शिस्त आणि संवेदनशीलता त्यांच्या मनात रुजली, तर वडिलांच्या समाजकार्यामुळे अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा त्यांना लाभली. शैक्षणिक क्षेत्रातही त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. आय.टी.आय. आणि डी.एड.पासून सुरू झालेला प्रवास त्यांनी एल.एल.बी.पर्यंत नेला. विविध क्षेत्रांतील शिक्षण घेत त्यांनी स्वतःला अधिक सक्षम बनवले. या बहुआयामी शिक्षणामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक परिपक्व आणि प्रभावी झाले आहे. पत्रकार म्हणून त्यांनी निभावलेली भूमिका विशेष उल्लेखनीय आहे. सत्य मांडण्याची जिद्द आणि कोणत्याही दबावाला न झुकण्याची वृत्ती यामुळे त्यांनी समाजात विश्वासार्हता मिळवली. त्यांच्या लेखणीत धार असून, सामान्य नागरिकांच्या समस्या आणि वेदनांना त्यांनी आवाज दिला. भ्रष्टाचार, अन्याय आणि सामाजिक प्रश्नांवर त्यांनी सातत्याने प्रकाश टाकला आहे. अ‍ॅडव्होकेट म्हणूनही त्यांनी अनेकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. कायद्याचे ज्ञान समाजाच्या हितासाठी वापरण्याची त्यांची भूमिका प्रेरणादायी ठरते. गरजू, वंचित आणि अन्यायग्रस्तांसाठी उभे राहत त्यांनी न्यायाची लढाई लढली आहे. त्यांच्या कार्यात प्रामाणिकपणा, निष्ठा आणि समाजाबद्दलची बांधिलकी स्पष्टपणे दिसून येते.

### कार्याचा गौरव करताना सर्वत्र अभिमान

यामुळेच रणजित जामखेडकर हे केवळ पत्रकार किंवा वकील न राहता, समाजाचा सजग प्रहरी म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कार्यातून समाजात जागरूकता निर्माण होत असून, अनेक तरुणांना प्रेरणा मिळत आहे. त्यांनी निवडलेली वाट कठीण असली तरी ती त्यांनी जिद्दीने पार पाडली आहे. आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करताना सर्वत्र अभिमान व्यक्त केला जात आहे.

